


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : ८० वा | मंगळवार | दि. २९ एप्रिल २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# पाप झाकण्यासाठी जिल्ह्यातील बोगस दिव्यांगांची धावाधाव...

## शिक्षणाधिकाऱ्यांच्या पुनर्तपासणी आदेशाला न्यायालयात आव्हान देण्याची तयार

**जनसंचलन/बुलढाणा**

बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्राप्त करून शासकीय नोकरीसह विविध प्रकारचे लाभ घेणारे बोगस दिव्यांग जिल्ह्यात प्रचंड आहेत. या बोगस दिव्यांगांचा पर्दाफाश करण्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज करीत आहे. याची दखल घेऊन शिक्षणाधिकाऱ्यांनी दिव्यांगांची पुनर्तपासणी करण्याचे आदेश काही दिवसांपूर्वी काढल्यानंतर बोगस दिव्यांगांमध्ये खळबळ उडाली असून, आता या बोगस दिव्यांगांची नोकरी टिकवण्यासाठी धावाधाव होत असल्याचे दिसून येत आहे. त्यासाठी प्रसंगी न्यायालयात जाण्याचाही नतद्रष्टपणा हे बोगस दिव्यांग करू लागले आहेत.शासनाकडून दिव्यांगांचे उत्थान व्हावे, यासाठी विविध प्रकारच्या योजना राबवल्या जात असतात. मात्र, दिव्यांग / अस्तिव्यंग नसतानाही या योजनांचा लाभ घेण्यासाठी अनेक प्रयत्न करीत असतात. या प्रयत्नात या बोगस दिव्यांगासह शासकीय यंत्रणेतत बसलेले काही भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने हे सर्व लाभ उपटण्याचे काम हे बोगस दिव्यांग करीत असतात. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यासंदर्भात सातत्याने वृत्त प्रकाशित करून या संपूर्ण यंत्रणेत लपलेल्या भ्रष्टाचाऱ्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न गेल्या वर्षांपासून चालवला आहे. या यंत्रणेत बोगस दिव्यांग सरकारी कर्मचाऱ्यांसमवेत काही खासगी एजंट आणि जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर्स व कर्मचारी तसेच दिव्यांग समितीचे काही अधिकारी देखील दोषी आहेत. या सर्वांच्या मदतीने एक भ्रष्टाचारी रॅकेट गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे.दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने यासंदर्भात वृत्तमालिका प्रकाशित करून हा संपूर्ण भ्रष्टाचार उघडकीस आणलेला आहे. दैनिक जनसंचनलच्या पाठपुराव्यामुळे अखेर शिक्षणाधिकाऱ्यांनी शिक्षण खात्यातील अशा बोगस दिव्यांग / अडतीव्यंग कर्मचाऱ्यांची शहानिशा करण्यासाठी सर्वच दिव्यांग कर्मचाऱ्यांची चाचणी करण्यासंदर्भात आदेश काढले होते. खरे तर ही प्रक्रिया होणे गरजेचे आहे. कारण यातूनच किती बोगस दिव्यांग कर्मचारी हे दिव्यांग बांधवांचा अधिकार मारत आहेत, हे स्पष्ट झाले असते. तसेच हा भ्रष्टाचार देखील उघड झाला असता. परंतु दुसरीकडे शिक्षणाधिकाऱ्यांच्या या आदेशानंतर बोगस दिव्यांगांमध्ये चांगलीच खळबळ उडाली आहे. कारण सरकारी नोकरीत असलेले अनेक धडधाकट बोगस दिव्यांग/अडतीव्यंग प्रमाणपत्र प्राप्त करून वर्षानुवर्षांपासून एकाच जागेवर चिकटून बसलेले आहेत. यासंदर्भातील ठोस पुरावे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडे प्राप्त झालेले आहेत. दैनिक जनसंचलनला मिळालेल्या खात्रिलायक माहितीनुसार ५३२+२३ =५५५ पेक्षा अधिक बोगस दिव्यांग कर्मचारी आज जिल्ह्याच्या शासकीय यंत्रणेत बसलेले आहेत.हे सर्व कर्मचारी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र घेऊन एकाच जागेवर काम करतात व बदली आणि डेप्युटेशन टाळण्याचा प्रयत्न करतात. काही तर एकाच जागी वर्षानुवर्षे राहिल्यामळे त्यांच्यासाठी ती पोस्ट एक भ्रष्टाचाराचे कुरणच बनली आहे. त्यामुळे अशा बोगस दिव्यांगांना शोधणे गरजेचे आहे. परंतु आता हे बोगस दिव्यांग कर्मचारी स्वतःची कातडी वाचवण्यासाठी एक झाल्याचे व त्या माध्यमातून शिक्षणाधिकाऱ्यांच्या




आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देण्याच्या तयारीत असल्याचे दिसून येत आहे. परंतु दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या बोगस दिव्यांगांचे प्रयत्न कधीही यशस्वी होऊ देणार नाही. बोगस दिव्यांग शोधून काढण्याची मोहीम शासन - प्रशासनाने राबवावी, यासाठी दैनिक जनसंचलन व  सिटी न्यूज पुरावे देऊन सर्वतोपरी सहकार्य करण्यास तयार आहे. खऱ्या दिव्यांग बांधवांचा हक्क मारणाऱ्या बोगस दिव्यांगाना कठोर शिक्षा होणे गरजेचे आहे. शिक्षणाधिकाऱ्यांनी आपल्या आदेशात कुठलाही बदल न करता सर्व दिव्यांगाची तपासणी ऑन केमेरा करावी. जोपर्यंत ही प्रक्रिया पूर्ण होऊन बोगस दिव्यांग जगासमोर उघडे पडत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली ही मोहीम अविरतपणे सुरू ठेवणार आहे

# माधव पाटीलचा काळा कारभार उघड! शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळणारा नेता?

## शेतकऱ्यांची सबसिडी लाटून आलिशान गाडीत स्वार! पाटीलच्या श्रीमंतीचा काळा डाग!

**जनसंचलन/ खामगाव**

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटाचा खामगाव तालुका अध्यक्ष माधव मोतीराम पांढरे उर्फ माधव पाटील याच्यावर शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करून आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. रामटेक येथील आनंद खंते या शेतकऱ्याने फसवणुकीमुळे आर्थिक संकटात सापडल्याने २ एप्रिल रोजी जंगलात झाडाला फाशी घेऊन आत्महत्या केली. त्याच्या सुसाईड नोटमध्ये माधव पाटील, त्याची पत्नी अंजली पाटील, युनियन बँकेचे मॅनेजर आशीष गोंडाणे व विश्वास लाबघरे यांनी संगणमत करून फसवणूक केल्याचा उल्लेख आहे.



माधव पाटील यांनी शेतकऱ्यांना शेडनेट हाऊससाठी सबसिडीसह कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केली. कर्जाची रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या नावाने मंजूर करून ती रक्कम त्यांच्या स्वतःच्या किंवा पत्नीच्या फर्मच्या खात्यात वळती केली. शेडचे साहित्य देण्याचे आश्वासन देऊनही प्रत्यक्षात काहीही न देता शेतकऱ्यांना टोलवाटोलवी केली. बँकेच्या अधिकाऱ्यांनी देखील नियम धाब्यावर बसवून कर्ज वितरीत केले.फसवणुकीमुळे त्रस्त झालेल्या आनंद खंते यांच्यावर कर्ज भरण्याचा तगादा लावला जाऊ लागल्याने त्यांनी आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेतला. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर माधव पाटील याच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा रामटेक पोलीस स्टेशनमध्ये दाखल करण्यात आला मोठ्या नेत्यांसोबत फोटो काढून बँक अधिकाऱ्यांवर दबाव टाकत आर्थिक व्यवहार करणारा माधव पाटील, अल्पावधीतच महागड्या गाड्यांमधून फिरू लागल्याने त्याच्यावर संशयाची सुई फिरली होती. आता हा सर्व प्रकार उघड झाला असून, जिल्ह्यातखळबळउडालीआहे.

# .... नंदनवन व्हावं सुरक्षित!...

## संपादकीय लेख

गेली ५५ वर्ष राजबागमध्ये आम्ही पर्यटकांच्या राहण्या-खाण्याची व्यवस्था करतो. खोऱ्यात दहशतवाद थैमान घालत होता, तेव्हाही पर्यटकांचा जीव धोक्यात येत नव्हता. पण या हल्ल्यात थेट पर्यटकांना लक्ष्य केलं गेलंय. त्या दिवसापासून पार मे अखेरपर्यंत आमच्याकडे असलेली सगळी बुकिंग्ज रद्द झाली आहेत. हा मोसम तर आता हातचा गेला पासष्ट वर्षांच्या अनिता मेहता यांचा आवाज टेलिफोनवर बोलतानाही कातर झाला होता. चारच दिवसांपूर्वी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे फक्त मेहता यांचंच नाही, तर संपूर्ण काश्मीर खोऱ्याचं कंबरडं मोडल्यासारखं झालं आहे. जम्मू-काश्मीर खोरं हे पृथ्वीवरील नंदनवन म्हणून ओळखलं जातं. पण या नंदनवनाला देशाच्या स्वातंत्र्यापासूनच रक्तरंजित घडामोडींचा शाप मिळाल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. आपापल्या मेंढ्या पाळणं, त्यांच्या लोकरीपासून आपल्या गरजेपुरते कपडे तयार करणं, आपल्यापुरती शेती करणं, फळं भाज्या पिकवणं, यात मशगुल असलेल्या काश्मिरी लोकांकडे आणि काश्मीरच्या निसर्गसौंदर्याकडे संपूर्ण भारताचं लक्ष वेधलं ते हिंदी चित्रपटसृष्टीने ! काश्मीर की कली, जंगली, जब जब फूल खिले अशा चित्रपटांमधील काश्मीरचं निसर्गसौंदर्य पाहून भारताच्या इतर भागांमधील लोकांना इथे येण्याची इच्छा झाली नसती, तरच नवल! १९७०च्या दशकानंतर काश्मीरमध्ये पर्यटन व्यवसाय बहरू लागला. या पर्यटन व्यवसायाला मोठा हादरा बसला तो १९८९-९० नंतर ! याच काळात दहशतवाद्यांनी काश्मीरमध्ये थैमान घातलं. सुरक्षा दले आणि दहशतवादी यांच्यातील चकमकी, काश्मीरमधील हिंदू पंडितांचं स्थलांतर, त्यानंतरही सुरू असलेल्या कारवाया, यामुळे १९९०च्या दशकात काश्मीरमधील पर्यटन जवळपास थंडावल्यासारखंच झालं. याच सुमारास महाराष्ट्रातील काही पर्यटन कंपन्यांनी काश्मीरमध्ये खास सहली आयोजित करायला सुरुवात केली. केसरी टूर्स हे त्यापैकीच एक मोठं नाव! सध्या केसरी टूर्सची जबाबदारी सांभाळणाऱ्या शैलेश पाटील यांनी गेली ४० वर्षे काश्मीरमधील पर्यटन व्यवसाय जवळून बघितला आहे. त्यांनी नोंदवलेली काही निरीक्षणं काश्मीरमधील पर्यटनाची दिशा पुढे कशी असेल, याचा अंदाज बांधण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. शैलेश पाटील म्हणतात की, काश्मीरमधील पर्यटन व्यवसाय खऱ्या अर्थाने गेल्या सात-आठ वर्षांमध्ये बहरला. सध्याच्या केंद्र सरकारने काश्मीरमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली आहे. अनेक पायाभूत सुविधांचं जाळं, परराज्यांतील व्यावसायिकांना हॉटेलं उभारण्यासाठी प्रोत्साहन, स्थानिकांना अत्यल्प व्याजदरात व्यवसाय उभारण्यासाठी कर्ज भांडवल, अशा अनेक योजनांमुळे काश्मीर खोऱ्यातील पर्यटन व्यवसायाला गती मिळाली. पाटील यांच्या या वक्तव्याला गृहमंत्रालयाने प्रसिद्ध केलेली आकडेवारीही पूरक आहे. स्वातंत्र्यानंतर जम्मूकाश्मीरला विशेष दर्जा देणारं कलम ३७० केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी हटवलं. त्यानंतर काश्मीरमध्ये काही काळ या निर्णयाविरोधात उद्रेक झाला. पण हळूहळू काश्मिरी लोकांनी हा निर्णय आपलासा केला. केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसारच त्या आधीच्या तीन दशकांमध्ये, म्हणजेच १९८९ ते २०१९ या काळात ४२ हजार लोक काश्मीर खोऱ्यात विविध दहशतवादी हल्ले, चकमकी यांत मारले गेले होते. यात प्रामुख्याने स्थानिक आणि सुरक्षा दलातील जवानांची संख्या जास्त होती. मात्र, २०१९ पासून २०२३ पर्यंत दहशतवादी कारवाया, चकमकी, त्यात झालेले स्थानिकांचे किंवा सुरक्षा जवानांचे मृत्यू यात लक्षणीय घट झाल्याचं ही आकडेवारी सांगते. २०१८ मध्ये २२८ दहशतवादी हल्ले झाले होते. त्यापैकी १८९ हल्ल्यांवेळी चकमकी झाल्या. या हल्ल्यांमध्ये ५५ नागरिक आणि ९१ सुरक्षा रक्षकांना जीव गमवावा लागला होता. २०२० मध्ये याच हल्ल्यांच्या संख्येत घट होऊन ती १२६ वर आली. यात ३८ नागरिकांचा आणि ६३ जवानांचा मृत्यू झाला. २०२३ हे वर्ष तर गेल्या काही दशकांमधील काश्मीर खोऱ्यातील सर्वात शांत वर्ष होतं. या वर्षांच्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत ४१ दहशतवादी हल्ल्यांमध्ये १३ स्थानिक आणि २० जवान यांचा मृत्यू झाला. याच काळात केंद्र सरकारने काश्मीरमध्ये केलेली गुंतवणूकही वाढती होती. ही गुंतवणूक प्रामुख्याने तेथील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी करण्यात आली. यात उत्तम दर्जाचे रस्ते, इलेक्ट्रिक बसगाड्या, बोगदे, स्थानिकांना रोजगार मिळावा, यासाठी दिली गेलेली मदत यांसाठी वापरली गेली. २०१९-२० मध्ये केंद्राने काश्मीरमध्ये २९६ कोटींचा निधी दिला होता. यात तब्बल दहा पटींनी वाढ होऊन २०२२-२३ या वर्षात २१५३ कोटी रुपयांची गुंतवणूक केंद्राने काश्मीर खोऱ्यात केली. वीणा वर्ल्डच्या वीणा पाटील यांनी या गुंतवणुकीचा परिणाम नेमका काय झाला, यावर प्रकाश टाकला. काश्मीरमध्ये काही वर्षांपूर्वी सकाळी चालायला जाणं शक्य नसायचं. पण केंद्र सरकारने सामान्य काश्मिरी लोकांना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी कर्ज देऊ केलं. त्यातून त्यांनी टॅक्सी घेतल्या, दुकानं सुरू केली. त्यांना रोजगार मिळाला. त्याशिवाय दल सरोवराच्या आसपास वॉटरफ्रंट तयार केली. रस्ते आणि पदपथ सजवले. श्रीनगरच्या रस्त्यांवरून किंवा काश्मीरमधील इतर शहरांमधूनही इलेक्ट्रिक बसगाड्या धावू लागल्या. त्यामुळे सर्वसामान्य काश्मिरी माणसाला हा बदल आवडत असल्याचंही त्यांनी सांगितलं या सर्वांचा परिणाम काश्मीरमधील पर्यटन व्यवसायावर होताना दिसत होतं. करोना काळात खालावलेल्या पर्यटनाने त्यानंतर उसळी घेतली आणि त्याचा सर्वांत जास्त फायदा सिक्कीम आणि काश्मीर यांना झाल्याचं केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या आकडेवारीत दिसून आलं. २०२३ या वर्षात तब्बल दोन कोटी पर्यटकांनी काश्मीरला भेट दिली. तसंच पर्यटनासाठी काश्मीर पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित असल्याचं निरीक्षणही ४९ टक्के पर्यटक आणि स्थानिकांनी नोंदवलं. या पार्श्वभूमीवर पहलगाम येथे पर्यटकांवर झालेला हल्ला काश्मीरच्या पर्यटन व्यवसायाच्या भवितव्यासाठी नक्कीच घातक आहे. या हल्ल्यानंतर महाराष्ट्रात, काश्मिरींना धडा शिकवला पाहिजे, त्यांच्यावर बहिष्कार टाकून त्यांची आर्थिक नाकाबंदी केली पाहिजे, असा सूर उमटू लागला आहे. संताप आणि भीतीच्या भरात अनेकांनी काश्मीरसाठी केलेली आपली आरक्षणं रद्द केली. अनेक जणांनी आता काश्मीरला जायला भीती वाटते, असं सांगत, यापुढेही काश्मीर टूरबद्दल साशंकच राहू, असं नमूद केलं.

# मुलीला पळवून लग्न केल्याच्या रागातून युवकाला मारहाण...

## सात जणांविरोधात साखरखेडा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे

**जनसंचलन/ साखरखेर्डा**

साखरखेर्डा गावात अलिकडच्या काळात मुलींना फूस लावून पळवून नेऊन परस्पर विवाह लावण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून, त्यामुळे गावात अशांततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अशाच एका घटनेच्या पार्श्वभूमीवर, २४ एप्रिल रोजी साखरखेर्डा धक्कादायक बसस्थानकावर एक पकार घ्टला २४ एप्रिल रोजी बसस्थानक परिसरात ही घटना घडली बसस्थानकावरुन घरी जात असलेल्या युवकाला अडवून एका गटाने बेदम मारहाण केली. सहा महिन्यांपूर्वी मुलीला पळवून विवाह केल्याच्या रागातून ही घटना घडली. या घटनेची तक्रार हरीश अनिल जैस्वाल यांनी साखरखेर्डा पोलिस ठाण्यात दिली असून, पोलिसांनी सात जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गेल्या एका वर्षात साखरखेर्डा येथे अशा प्रकारच्या २० ते २५ घटना घटल्याचे सांगितले जात आहे. अनेक प्रकरणांमध्ये मुलींचे वय १८ वर्षांपेक्षा अधिक असल्याने, त्यांनी स्वतःच्या इच्छेने विवाह केल्याचे कारण देत



पोलीस कारवाई करीत नाहीत. मात्र, काही वेळातच या जोडप्यांचे फोटो सोशल मिडियावर व्हायरल होत असल्याने गावात अस्वस्थता वाढली आहे. २१ एप्रिल रोजीही असाच प्रकार घडला होता, ज्यात युवकाच्या मित्राला मारहाण करण्यात आली होती. या सर्व घटनांमुळे गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाकडून योग्य पावले उचलण्याची मागणी ग्रामस्थ करत भाटेत

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.*
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# पराभवानंतर काही नेत्यांच्या मानसिकतेवर परिणाम झाला, त्यामध्ये राऊत नंबर एक तटकरेंकडून तिखट समाचार...

**रत्नागिरी :** काश्मीर येथे पहलगाम झालेल्या हल्ल्यानंतर अडकलेल्या पर्यटकांसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री गिरीश महाजन गेले होते. यावर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी टीका केली होती. यावरून राष्ट्रवादीचे नेते खासदार सुनील तटकरे यांनी संजय राऊत यांचा समाचार घेतला आहे. विधानसभा निवडणुकीच्या दारुण पराभवानंतर ज्या काही नेत्यांच्या मानसिकतेवर परिणाम झाला आहे. त्या परिणाम झालेल्या नेत्यांमध्ये नंबर एकचे आहेत ते संजय राऊत, असा खोचक टोला सुनील तटकरेंनी लगावला आहे. सुनील तटकरे म्हणाले, राऊत कधीही कुठल्याही विषयावर रोज सकाळी नऊ वाजता बोलत असतात. त्यांचे बोलणे तर्कहीन आणि दिशाहीन असते. विधानसभा निवडणुकीच्या दारुण पराभवानंतर त्यांच्यातले नैराश्य ते अजून घालवू शकलेले नाहीत. कदाचित




त्यांच्यावर मानसिक उपचाराची गरज असेल, असं वाटत आहे. रायगडच्या पालकमंत्री पदाबाबत विचारले असता तटकरे म्हणाले की, याबाबतचा निर्णय लवकरच मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री घेतील. हा विषय तुमच्याकडून व गोगावले यांच्याकडून दोघांकडूनही प्रतिष्ठेचा करण्यात आला आहे. यावर तटकरे म्हणाले की, मी कधीही आजपर्यंत माझ्या राजकीय जीवनात कोणता विषय प्रतिष्ठेचा केलेला नाही. शेवटी प्रत्येकाच्या कामाचे मूल्यमापन होत असते हा निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील, अशी सावध प्रतिक्रिया सुनील तटकरे यांनी दिली आहे. दरम्यान मंत्री नितेश राणे आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्यात सुरू असलेल्या वाकयुद्धाबाबत विचारलं असता तटकरे म्हणाले, हे दोघेही कोकणातील आहेत. दोघांनीही एकेकाळी एकाच पक्षात काम केलं आहे. त्यामुळे नेमकं कशामुळे इश्यू तयार झाला आहे, हे त्या दोघांना माहिती. माहिती म्हणून काम करत असताना काही वेळेला प्रत्येकाचे मत सारखेच होतील, सर्वच गोष्टीवर एकमत होईल अशातला भाग नाही. पण कोणीही जाहीर वक्तव्य करू नयेत अशी अपेक्षा महायुतीमधील प्रत्येक वरिष्ठ नेत्याची आहे, सुनील तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले आहे.मुंबई गोवा राष्ट्रीय मार्गावर रखडलेल्या माणगाव येथे वाहतूककोंडी होत आहे यासाठी बायपास मार्ग रखडला आहे याबाबत प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, याबाबत केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याकडे तीन ते चार वेळा बैठक झाली. या कामाची आता नव्याने वर्क ऑर्डर झाली आहे. त्यामुळे येथे चार ते पाच दिवसात संबंधित ठेकेदार माणगाव बायपासचे काम सुरू करीत अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली. त्यानंतर झालेल्या राष्ट्रवादी पक्षाच्या कार्यक्रमात त्यांच्या हस्ते मंगल कलश पूजन करण्यात आले. दापोली तालुक्यातील पाच नररत्नांच्या मूळगावातून आणलेल्या कलशाचे पूजन यावेळी खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

पालगड येथील साने गुरुजी, मुरुड येथील भारतरत्न महर्षी कर्वे, भारतरत्न पा.वा.काणे,चिखलगाव येथील लोकमान्य टिळक, केळशी येथील छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु याकूबबाबा सर्वरी यांच्या मूळ गावातून आणलेल्या मंगल कलशांचे पूजन करण्यात आले. हे कलश राष्ट्रवादीच्या मंगल कलश यात्रेत रत्नागिरी व मुंबई येथे नेण्यात येणार आहेत अशी माहिती राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाजीराव जाधव तालुकाध्यक्ष जयवंत जालगावकर, महिला जिल्हाध्यक्ष व नगरसेविका साधना बोत्रे, रमा बेलोसे, नेहा जाधव, विनिता शिगवण, मोहन मुळये, माजी नगरसेवक नितीन मयेकर आदी उपस्थित होते.

# धर्म विचारण्यासाठी दहशतवाद्यांना वेळ होता का?; वादग्रस्त वक्तव्यानंतर वडेट्टीवारांची सारवासारव...

**नागपूर :** पहलगाम येथे दहशतवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला तेव्हा त्यांना धर्म विचारायला वेळ होता का? असे वादग्रस्त विधान काँग्रेसचे विधानसभेतील पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केले. त्यावर तिखट प्रतिक्रिया येऊ लागल्याने काही तासातच त्यांनी आपली भूमिका बदलली. दहशतवादी आणि त्यांची पाठराखण करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, काँग्रेसचा त्यास पाठिंबा राहील असे सारवासारव करणारे वक्तव्य नंतर त्यांनी केले. प्रसारमाध्यमांशी सोमवारी बोलताना वडेट्टीवार म्हणाले, दहशतवादी हल्ल्याचा मुख्य हेतू दोन धर्मांमध्ये तेढ निर्माण करून भारतातील एकात्मता भंग करणे आणि देशात अस्थिरता निर्माण करणे हा आहे. त्यामुळे दहशतवाद्यांचे समर्थन करणाऱ्यांवर कारवाई करावी. देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी देशविघातक प्रवृत्तींना मोडून काढणे अत्यावश्यक आहे. त्यापूर्वी वडेट्टीवार यांनी दहशतवादी हल्ला करतेवेळी लोकांशी बोलत बसतात का? धर्म विचारत बसतात का? असे विधान करत खळबळ उडवून दिली. काही पर्यटक सांगत आहेत की दहशतवाद्यांनी गोळ्या झाडण्यापूर्वी लोकांना धर्म विचारला तर काहीजण सांगतायत की असे काही घडलेच नाही. सत्ताधाऱ्यांकडून भारत-पाकिस्तान असा जप चालला असतो. त्यांनी आता सांगावं की या हल्ल्याची जबाबदारी कोणाची? हा हल्ला म्हणजे सरकारचं अपयश असल्याचं सरकारने स्वीकारावे, असं




म्हटलं.पहलगाममध्ये जे काही घडले, २७ जण त्या हल्ल्यात मारले गेले. पहलगाममध्ये, काश्मीर खोऱ्यात सुरक्षा व्यवस्था का नव्हती? तिथली सुरक्षा व्यवस्था का हटवली? अतिरेकी देशाची सीमा ओलांडून २०० किलोमीटरपर्यंत आत घुसले आणि आपल्या लोकांना त्यांनी मारले. हे सगळे होत असताना मोदी सरकार काय करत होते? त्यांची गुप्तचर यंत्रणा काय करत होती, असे प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केले. वडेट्टीवारांनी सध्या राज्यात गाजत असलेल्या शिक्षक भरती घोटाळ्याची ईडी चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली आहे. यासाठी एसआयटी नेमकी गेली पाहिजे. उच्चस्तरीय चौकशी होऊन यात जे संस्थाचालक दोषी आहेत, शिक्षक विभागाची यंत्रणा दोषी आहे त्यांच्यावर कारवाई करा. मात्र, ज्यांनी घोटाळे केले नाही त्यांना वाचवण्यासाठी निरपराध माणसाचा बळी घेऊ नका, असेही ते म्हणाले.

# तू मला खूप आवडतेस, माझे प्रेम आहे, तू जर नाही म्हणालीस तर... म्हणत बारामतीमध्ये तरुणीचा विनयभंग....

**बारामती :** तू मला खूप आवडतेस माझे तुझ्यावर प्रेम आहे. तू मला होकार दे, तू जर नाही म्हणालीस तर मी फाशी घेईनफ असे म्हणत महाविद्यालयीन तरुणीचा विनयभंग केल्याची घटना बारामतीत घडली आहे. याप्रकरणी बारामती तालुक्यातील वडगाव निंबाळकर पोलिस ठाण्यात आदित्य साळुंके (रा. वडगाव निंबाळकर, ता. बारामती) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वीस वर्षीय महाविद्यालयीन तरुणीने याबाबत फिर्याद दाखल केली. फिर्यादी नमूद केल्यानुसार २२ जानेवारी ते २६ एप्रिल या कालावधीत सोमेश्वरनगर मधील एका महाविद्यालयात हा प्रकार घडला. फिर्यादी तरुणी महाविद्यालयात अभ्यास करीत असताना आदित्य साळुंके याने तिच्या जवळ जात तिच्याकडे वाईट भावनेने पाहिले. तू मला होकार दे, असे म्हणून त्याने फिर्यादीस त्रास दिला. तू नाही म्हणालीस तर मी फाशी घेईन, असे सांगत फिर्यादीस ब्लॅकमेल केले. तरुणीने त्याला माझ्या मागे मागे येऊ नकोस, तू माझ्यापेक्षा लहान आहेस, माझ्या मनात तुझ्याविषयी काही भावना नाहीत, असे स्पष्टपणे सांगितले. तरीही त्याने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने त्याच्या भावाला बोलावून घेते असे सांगितले. शिवाय ती दप्तर घेऊन बाहेर पडत असतानाही त्याने तिला जिन्यात अडवले. तू माझ्या घरच्यांना याबाबत काही सांगितले तर मी फाशी घेईन, अशी धमकी त्याने दिली. त्यामुळे तरुणीने तिच्या घरी हा प्रकार सांगितला आणि पोलिस ठाण्यात जात फिर्याद दाखल केली. या घटनेनंतर मोठी खळबळ उडालीये. गेल्या काही दिवसांपासून हा तरुण मुलीला त्रास देत होता. हेच नाही तर तिने सांगूनही तो तिच्या मागे मागे जात होता. त्याने फाशी घेण्याची धमकी दिल्यानंतर तरुणीने घडलेला सर्व प्रकार हा तिच्या घरी सांगितला. यानंतर पोलिसांनी विनभंगाचा गुन्हाही दाखल केला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बॉलिवूडच्या या हसीनाला पाहताच पाकिस्तानी क्रिकेटपटूची पडलेली विकेट

## लग्नाच्या चर्चांनाही आलेला वेग पण...



**मुंबई** - बॉलिवूड आणि क्रिकेट यांचं अनेक वर्षांपासूनचं नातं आहे. बॉलिवूड अभिनेत्री क्रिकेटपटूंच्या प्रेमात पडल्या. काहींची प्रेमकथा पूर्ण झाली तर काहींची अपूर्ण. आज आपण अशाच एका जोडप्याबद्दल जाणून घेणार आहोत. ज्यांचं नातं चर्चेत होतं पण त्यांचं हे नातं फार काळ टिकलं नाही. माजी पाकिस्तानी क्रिकेट स्टार वसीम अक्रम आणि बॉलिवूड अभिनेत्री सुष्मिता सेन यांचं अनेक वर्ष रिलेशनशिप होतं. दोघांचं नाते वेगळं होतं ज्यामुळे बातम्यांमध्ये चांगलीच चर्चा झाली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, स्विंग जादूगार वसीम अक्रम पहिल्याच नजरेत माजी मिस युनिव्हर्स सुष्मिता सेनच्या प्रेमात पडले, त्यानंतर दोघेही एकमेकांना डेट करू लागले. क्रिकेटच्या मैदानावर त्यांच्या दमदार गोलंदाजीसाठी प्रसिद्ध असलेले वसीम अक्रम आणि ब्युटी क्वीन सुष्मिता सेन यांची भेट २००८ मध्ये झाली. त्यांची भेट एका रिॲलिटी शोद्वारे झाली ज्यामध्ये ते दोघेही परीक्षक होते. या भेटीने दोघांमधील घनिष्ठ संबंधांचा पाया रचला. त्यावेळी अक्रम विवाहित असले तरी सुष्मिता सेनसोबतचं त्यांचं नातं कोणापासूनही लपलेलं नव्हतं. काही दिवसांतच दोघांनाही एकमेकांची खूप आवड निर्माण झाली.एवढंच नाही तर सुष्मिता सेनने एका मुलाखतीत अक्रमवरील तिचं प्रेमही मान्य केलं अभिनेत्रीनं त्यांच्या नात्याला मैत्री म्हटलं. सततच्या अफवांमुळे निराश झालेल्या अक्रम यांनी आपली नाराजी व्यक्त केली होती आणि म्हटलं होतं की, मी माध्यमांमधील अशा अफवांना कंटाळलो आहे.२००९ मध्ये वसीम अक्रम यांच्या पहिल्या पत्नीचं निधन झालं, जो त्यांच्यासाठी मोठा धक्का होता. वसीम अक्रम यांना त्याच्या पहिल्या पत्नीपासून दोन मुलं होती. ही घटना खूप दु:खद होती, पण त्यानंतर वसीम अक्रम आणि सुष्मिता सेन अनेक वेळा एकत्र दिसले, ज्यामुळे त्यांच्या लग्नाच्या अफवांना वेग आला. काही रिपोर्ट्समध्ये असा दावाही करण्यात आला होता की, सुष्मिता सेन वसीम अक्रम यांच्याशी लग्न करण्यास तयार आहे.दरम्यान, २०१३ मध्ये वसीम अक्रम यांनी शॅनिएरा थॉम्पसनशी लग्न केलं तेव्हा कथेला वेगळे वळण मिळालं, जिच्यापासून त्यांना एक मुलगी आहे. अशाप्रकारे, सुष्मिता सेनसोबतच्या त्यांच्या नात्याबद्दलच्या चर्चांना पूर्णविराम मिळाला.

# विवेक फणसळकर निवृत्त होणार, मुंबई पोलीस आयुक्तपदी कोण?

## वर्मा-दातेंसह महिला अधिकाऱ्याचं नावही चर्चेत....

**मुंबई** : मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसळकर हे उद्या, बुधवारी सेवानिवृत्त होत असून त्यांच्या जागी कुणाची वर्णी लागणार, याकडे संपूर्ण पोलिस दलाचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र पोलिस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी, सेवाज्येष्ठतेमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेले कायदेशीर आणि तांत्रिक विभागात कार्यरत असलेले संजय कुमार वर्मा, राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) ची धुरा सांभाळणारे सदानंद दाते यांची नावे आयुक्तपदाच्या स्पर्धेत आहे. मुंबईच्या विशेष पोलिस आयुक्तपदी विराजमान असलेले देवेन भारती यांचे नावही आयुक्तपदासाठी चर्चेत असल्याचे म्हटले जात आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते काही दिवसांपूर्वी मुंबई पोलिसांच्या विविध इमारती आणि योजनांचा शुभारंभ पार पडला. यावेळी त्यांनी विवेक फणसळकर निवृत्त होत असले तरी त्यानंतरही त्यांना काम करायचे आहे, असे वक्तव्य केले होते. त्यावेळी फणसळकर यांना मुदतवाढ मिळणार का? याबाबत सुरू झालेली चर्चा आजही सुरू आहे. त्यातच त्यांना मुदतवाढ न मिळाल्यास आयुक्तपदी कोण विराजमान होणार याबाबत वेगवेगळ्या चर्चा आणि अंदाज पोलिस दलात बांधले जात आहेत. पोलिस सेवेतील ज्येष्ठतेनुसार १९९० च्या बॅचचे आयपीएस अधिकारी संजय कुमार वर्मा हे आयुक्तपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहेत. एप्रिल २०२८ मध्ये निवृत्त होणार असलेल्या वर्मा यांनी नोव्हेंबर २०२३ मध्ये काही काळासाठी पोलिस महासंचालक म्हणून काम केले होते. त्यांच्याच बॅचचे असलेले आयपीएस अधिकारी सदानंद दाते यांचेही नाव चर्चेत आहे. सध्या केंद्रीय प्रतिनियुक्तीवर असलेले दाते हे राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख आहेत. दहशतवादी तहव्वूर राणा यांच्या प्रत्यार्पणामध्ये दाते यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यांचा तपास करणाऱ्या या अधिकाऱ्याने प्रत्यक्षात हल्ल्यादरम्यान दहशतवाद्यांशी दोन हात केले होते.महिला अधिकारी म्हणून १९९३ च्या बॅचच्या अर्चना त्यागी या प्रबळ दावेदार आहेत. मुंबईच्या आयुक्तपदी पहिल्या महिला अधिकारी म्हणून शासनाच्या वतीने त्यागी यांची नियुक्ती केली जाऊ शकते.

# एकाच चेंडूवर कॅच व रन आऊटची संधी हुकली, आरसीबीने नेमकी कुठे मॅच जिंकली

**नवी दिल्ली** : आरसीबी आणि दिल्ली यांचा सामना चांगलाच रंगला होता. पण यावेळी सामन्यात एकच चेंडू टर्निंग पॉइंट ठरला. कारण या एका चेंडूवर कॅच सुटली आणि त्याचबरोबर रन आऊटची संधीही हुकली. त्यामुळे हा चेंडू या सामन्यात सर्वात महत्वाचा ठरला. ही गोष्ट घडली ती १६ व्या षटकात. त्यावेळी मिचेल स्टार्क हा गोलंदाजी करत होता. विराट कोहली आणि कृणाल पंड्या दमदार फलंदाजी करत होते. या षटकातील अखेरच्या चेंडूवर ही गोष्ट घडल्याचे पाहायला मिळाले. कृणाल पंड्या हा विराट कोहलीपेक्षा दमदार कामगिरी करत होता. त्यावेळी ही गोष्ट घडली आणि सामना फिरल्याचे पाहायला मिळाले.या १५ व्या षटकाच्या सहाव्या चेंडूवर ही गोष्ट घडली. स्टार्कने चांगला चेंडू टाकला होता. पण कृणाल एवढ्या चांगल्या फॉर्मात होता की, त्याने या चेंडूवर मोठा फटका मारला. पण या चेंडूवर खेळताना कृणालचे टायमिंग चांगले झाले नाही. कृणालचे टायमिंग हुकले आणि हा चेंडू हवेत उडाला. त्यावेळी दिल्लीचा अभिषेक पोरेल हा सामान सहजपणे पकडेल, असे वाटत होते. कारण त्याच्या समोरच हा चेंडू आला होता. अभिषेक पोरेलने ही कॅच सोडली आणि कृणालला जीवदान मिळाले. कृणाल त्यावेळी ५२ धावांवर होता. त्याच चेंडूवर रन आऊट करण्याची संधीही दिल्लीच्या संघाला होती. पण अभिषेकने कॅच सोडली आणि तो चेंडू शोधत होता. त्यावेळी स्टार्कने त्याला लगेच चेंडू टाकायला सांगितला, पण त्याच्याकडून उशिर झाला. त्यामुळे या सामन्यात दिल्लीकडून रन आऊटची संधीही हुकली. दुसरीकडे स्टार्ककडे अभिषेकने चेंडू फेकला खरा, पण त्याला हा चेंडू पकडता आला नाही. त्यामुळे आरसीबीच्या संघाला अजून एक धाव मिळाली. त्यामुळे हा एकच चेंडू आरसीबीच्या विजयासाठी



महत्वाचा ठरला.दिल्लीच्या संघाला कृणालला बाद करून आरसीबीला पराभूत करण्याची संधी आली होती. पण एकाच चेंडूवर दिल्लीच्या संघाने हा सामना गमावला. कारण या एकाच चेंडूवर दिल्लीच्या संघाने कॅच सोडली आणि रन आऊटची संधीही हुकली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बाप झाला वैरी, पोटची मुलगी ४ महिन्यांची गरोदर, तरीही निष्ठूर पित्याने संपवलं....

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यातील चोपडा शहरात शनिवारी रात्री सैराट चित्रपटाची पुनरावृत्ती झाल्याची घटना घडली. एका सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याने प्रेम विवाहाच्या रागातून आपल्या मुलीसह जावयावर गोळीबार केला आहे. जावयाच्या बहिणीच्या लग्नानिमित्त आयोजित हळदीच्या कार्यक्रमात निवृत्त पोलीस अधिकारी असलेला किरण मांगले याने आपली मुलगी तृप्ती वाघ आणि जावई अविनाश वाघ या दोघांवर गोळीबार केला. या घटनेत मुलगी तृप्ती वाघ हिचा जागीच मृत्यू झाला. तर जावई अविनाश वाघ गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर जमावाने गोळीबार करणाऱ्या निवृत्त सीआरपीएफ अधिकाऱ्याला चांगलाच चोप दिल्याने तो देखील गंभीर जखमी झाला. हृदयद्रावक म्हणजे वडिलांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेली तृप्ती ही चार महिन्यांची गर्भवती होती. धुळे जिल्ह्यातील शिरपूरमध्ये राहणारी तृप्ती मांगले ही वैद्यकीय शिक्षणानिमित्त पुण्यात असताना नातेवाईकांमधील अविनाश वाघ




याच्याशी तृप्तीचे प्रेम संबंध जुळले. या प्रेमसंबंधातून तृप्तीने अविनाशशी विवाह करण्याचा निर्णय घेतला. मात्र या निर्णयाला तृप्तीचे वडील किरण मांगले यांचा विरोध होता. मात्र हा विरोध झुगारून तृप्तीने एक वर्षांपूर्वी अविनाशी लग्न केले. पुण्यातील कोथरूड परिसरात राहणारे अविनाश वाघ आणि तृप्ती या दोघांचा संसार हा सुरळीत सुरू होता. अविनाश वाघ याच्या बहिणीचे चोपडा शहरातील आंबेडकर नगरमध्ये विवाह सोहळा होता. या विवाह सोहळ्यासाठी अविनाश आणि तृप्ती हे दोघेही पुण्यावरून चोपडा येथे आली होते. तृप्ती आणि अविनाश दोघेही चोपडा येथे आल्याची माहिती तृप्तीचे वडील किरण मांगले यांना मिळाली. किरण मांगले याने चोपडा आंबेडकर नगर येथे येऊन आले. या समारंभात अविनाश आणि तृप्ती हे दोघेही जल्लोष साजरा करत असताना किरण मांगले आला. त्याने थेट आपल्या मुलीवर गोळीबार केला. त्यानंतर जावई अविनाश यावर देखील गोळीबार केला. मुलीला अगदी जवळून गोळी लागल्याने तृप्ती वाघ ही जागीच ठार झाली. तर जावई अविनाश वाघ हा गंभीर जखमी झाला. या घटनेनंतर जमावाने सेवानिवृत्त सीआरपीएफ अधिकारी असलेला किरण मांगले यास पकडून चोप देत गंभीर जखमी केले. तृप्ती आणि अविनाश हे जवळचे नातेवाईक, मात्र दोन्ही कुटुंबात वैर होते. वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी तृप्तीने पुण्यातील डी.वाय.पाटील कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि त्यानंतर अविनाश आणि तृप्ती यांच्यात संपर्क वाढला. त्यातूनच दोघे प्रेमाच्या बंधनात अडकले. कुटुंबाचा वाद असला तरी अविनाश हा नात्यातीलच असल्याने आपले वडील आपल्या विवाहाला मान्यता देतील असा तृप्तीचा विश्वास होता. याबाबत तिथे आपल्या वडिलांना सांगितले. मात्र अविनाश याच्या कुटुंबाशी असलेलं वैर तसेच तृप्तीच्या तुलनेत अविनाशच कमी असलेले शिक्षण यामुळे तृप्तीचे वडील किरण मांगले यांनी या विवाहला कडाडून विरोध केला. मात्र वडिलांचा विरोध झुगारून दोन वर्षांपूर्वी तृप्तीने अविनाश सोबत पळून जात पुण्यात विवाह केला. हाच राग गेल्या वर्षभरापासून किरण मांगले याच्या डोक्यात होता. त्यामुळे मुलीला आणि जावयाला संपवण्याचा डाव हा किरण मांगले याने आखला होता. पण मात्र तो वाट पाहत होता ती योग्य संधीची.अविनाशच्या बहिणीचे लग्न चोपडा येथे असल्याची माहिती ही किरण मांगले यास मिळाली आणि ही संधी साधत किरण मांगले हा धुळे जिल्ह्यातील शिरपूर येथून चोपडा येथे आला. शनिवारी हळदीचा कार्यक्रम सुरू असताना त्याच ठिकाणी किरण मांगले याने आपल्या मुलीवर आणि जावयावर बेछूट गोळीबार केला. किरण मांगले हा सीआरपीएफमधील माजी अधिकारी असल्याने त्याच्याकडे सर्व्हिस रिवॉल्वर होती आणि याच रिवाल्वरने आपल्या मुलीचा जीव घेतला. महत्वाचे म्हणजे तृप्ती ही चार महिन्यांची गर्भवती असल्याची माहिती तिची सासू प्रियांका वाघ यांनी दिली. एवढेच नव्हे तर, मागे एकदा किरण मांगले याने आपल्या मुलीचा जबरदस्ती गर्भपात केल्याचा आरोप देखील मयत तृप्तीच्या सासूने केला आहे. दरम्यान तृप्ती चार महिन्यांची गर्भवती असल्यामुळे या हल्ल्यात एक नव्हे तर दोन जीव गेले आहेत.

# मुंबई इंडियन्सला विजयानंतरही बसला मोठा धक्का, हार्दिकने जे कमावलं ते गमावण्याची आली नामुष्की..

**मुंबई :** लखनौ सुपर जायंट्सच्या संघावर मुंबई इंडियन्सने रविवारी मोठा विजय साकारला. पण या विजयानंतरही आता मुंबईच्या संघाला मोठा धक्का बसला आहे. त्यामुळे मुंबईने जे काही कमावलं होतं, ते गमावण्याची वेळ आता त्यांच्यावर आलेली आहे. मुंबईने घरच्या मैदानात दमदार कामगिरी केली. सूर्या आणि रायन यांनी तुफानी अर्धशतकं झळकावली, त्यामुळे मुंबईच्या संघाला २१५ धावा करता आल्या. त्यानंतर जसप्रीत बुमराहने चार आणि विल जॅक्सने एकाच षटकात दोन बळी मिळवले. त्यामुळेच मुंबईच्या संघाला ५४ धावांनी दमदार विजय मिळवता आला. या विजयानंतर भारताला एक गुड न्यूज मिळाली होती. मुंबईचा हा सलग पाचवा विजय होता. पण या विजयानंतर मुंबईने जे कमावलं होतं, ते गमावण्याची वेळ त्यांच्यावर आली होती.या सामन्यापूर्वी मंबईच्या संघाने ९ सामने खेळले होते. या ९ सामन्यांत मुंबईचे पाच विजय झाले होते, तर चार लढतींत त्यांना पराभव पत्करावे लागले होते. त्यामुळे मुंबईच्या संघाचे १० गुण झाले होते आणि ते पाचव्या स्थानावर विराजमान होते. पण मुंबईच्या संघाने लखनौवर दमदार विजय साकारला. त्यामुळे मुंबईला दोन गुण मिळाले. या दोन गुणांसह मुंबईचे १२ पॉइंट्स झाले. त्यामुळे मुंबईच्या संघाला गुड न्यूज मिळाली होती. कारण जो मुंबईचा संघ पाचव्या स्थानावर होता, त्यांना थेट दुसरे स्थान मिळाले होते. मुंबईने ५४ धावांनी दणदणीत विजय साकारला. त्यामुळे आरीसीबी आणि दिल्ली यांचे मुंबईसह समान १२ गुण होते.

पण रन रेटच्या जोरावर मुंबईने दुसरे स्थान गाठले होते. पण रविवार संपण्यापूर्वीच मुंबई इंडियन्सच्या संघाला मोठा धक्का बसला. कारण रविवारी झालेल्या दुसऱ्या सामन्यात आरसीबीने दिल्लीवर दमदार विजय साकारला. त्यामुळे जो आरसीबीचा संघ तिसऱ्या स्थानावर होता, तो थेट अव्वल स्थानावर पोहोचला, त्यानंतर जो दुसऱ्या स्थानावर गुजराचा संघ होता तो दुसऱ्या स्थानावर पोहोचला. मुंबईने विजयासह दुसरे



स्थान कमावले होते, पण त्यांना आरसीबीच्या विजयामुळे ते गमवावे लागले आणि सध्याच्या घडीला त्यांची तिसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे.मुंबई इंडियन्सच्या संघाने रविवारी लखनौवर विजय साकारला खरा, पण त्यानंतर त्यांच्यासाठी एक वाईट बातमी आली आणि त्यांना आता मोठा धक्का बसला आहे. कारण मुंबईच्या संघाने जे काही कमावलं होतं ते त्यांना गमवावं लागलं असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# आजीचे पैसे चोरुन पिस्तूल खरेदी, आईस्क्रिम खाताना गोळी झाडली... कॅफे मालक हत्या प्रकरणाचा उलगडा....




**नागपूर:** अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गोकुळपेठ परिसरातील सोशा कॅफेचे संचालक अविनाश राजू भुसारी (वय २८) यांच्या हत्या प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या विशेष मोहिमेत बंटी उर्फ शैलेश विनोद हिरणवारसह पाच आरोपींना उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये बंटी हिरणवार, बाबू हिरणवार, आदर्श वाळके, दीपू मेश्राम आणि शिबू यादव यांचा समावेश आहे. १४ एप्रिल २०२५ रोजी मध्यरात्री अविनाश भुसारी यांच्यावर गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. तपासादरम्यान उघड झाले की, फरार शेखू टोळीशी सुरू असलेल्या वादातून बंटी व बाबू हिरणवार यांनी इतर साथीदारांच्या मदतीने हा हल्ला घडवून आणला होता. विशेष बाब म्हणजे अविनाश भुसारी यांचा या वादाशी थेट काहीही संबंध नव्हता. फक्त शेखू टोळीतील अविराज उर्फ अवि भुसारी यांचे नातेवाईक असल्यामुळे त्यांना लक्ष्य करण्यात आले.पवन हिरणवारच्या हत्येचा बदला घेण्यासाठी शेखू खान टोळीविरोधात कट रचण्यात आला होता. बंटी हिरणवार व साथीदारांनी प्रवेश गुप्ता आणि धीरज बांबुर्डे यांना लक्ष्य केले होते. आंबेडकर जयंतीला पांढरा बोडी परिसरात मिरवणूक काढणाऱ्या प्रवेश गुप्तावर १४ एप्रिलला हल्ला करून दंगल घडवण्याचा मारेकऱ्यांचा डाव होता. पोलीस बंदोबस्तामुळे तपासात अडथळा येईल, असा त्यांचा अंदाज होता. मात्र, गुप्ता आणि बांबुर्डे मिरवणुकीत सहभागी झाले नाहीत, त्यामुळे ते थोडक्यात बचावले.या हत्येसाठी वापरलेल्या शस्त्रास्त्रांसाठी बंटीच्या आजी किरण हिरणवार यांच्या १ लाख २० हजार रुपयांची चोरी करण्यात आली. शिबू यादवने पैसे चोरले आणि त्यातून बंटीने मध्यप्रदेशातील रिवा येथून तीन पिस्तूल खरेदी केली. याशिवाय राहुलने उत्तरप्रदेशातून २० काडतूस आणले. जंगलातील दारुपार्टीत शेखू टोळीच्या सदस्यांचा खून करण्याचा कटही रचला गेला होता. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते आणि पोलिसांसमोर मोठे आव्हान निर्माण झाले होते. आरोपी सतत आपले ठिकाण बदलत होते आणि फार काळ एकाच ठिकाणी न थांबत तांत्रिक विश्लेषणाला गुंगारा देत होते. सुरुवातीला पोलिसांनी अल्पवयीन आरोपी व आकाश शेंद्रे यांना अटक केली होती. त्यानंतर, बंटीच्या जवळच्या मित्र ऋषभ वानखेडे व मैत्रीण सिमरन लोखंडे यांना आरोपींना मदत केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. गुन्हा केल्यानंतर आरोपी भंडारा, कोलकाता, विशाखापट्टनम, तिरुपती बालाजी, बल्लारशाह, गोंदिया अशा विविध ठिकाणी फिरत राहिले. मात्र, पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवले आणि योग्यवेळी पथके पाठवून सर्व आरोपींना शिताफीने अटक केली. नवेगाव बांध रेल्वे स्थानकावरून मुख्य आरोपी बंटी हिरणवार व त्याचे साथीदार तर गोंदिया बस स्थानकावरून इतर आरोपींना पकडण्यात आले.ही कारवाई पोलीस आयुक्त रविंद्र सिंघल, सह आयुक्त निसार तंबोली, अप्पर आयुक्त संजय पाटील आणि उपायुक्त (डिटेक्शन) राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईमुळे नागपूर शहरात मोठा दिलासा व्यक्त केला जात असून, उर्वरित फरार आरोपींच्या शोधासाठी तपास अधिक वेगाने सुरू आहे.

## अमेरिकेला जाऊन शिकला अभिनय, ९०० कोटींचा सिनेमा देऊनही नेटवर्थच्या बाबती बायकोच्या बराच मागे आहे हा स्टार...

**मुंबई:** गेल्या काही वर्षात बॉलिवूडमध्ये अनेक स्टारकिड्स आले, पण सगळ्यांनाच यश मिळालं असं नाहीये.काहीच स्टारकिड्स स्वत:च्या अभिनयाच्या जोरावर पुढं आले. यापैकी एक स्टारकिड आहे तो म्हणे अभिनेता रणबीर कपूर. अभिनेते ऋषी कपूर आणि नितू कपूर यांचा मुलगा इंडस्ट्रीवर राज्य करतोय. बॉलिवूडमधल्या टॉप अभिनेत्यांच्या यादीत तो आहे. ऋषी कपूर यांनी कमी वयातच सिनेइंडस्ट्रीत एन्ट्री केली होती. त्यांच्या मुलानं देखील पावलावर पाऊल ठेवल बॉलिवूडमध्ये जोरदार एन्ट्री केली. आज तो सुपरस्टार झाला आहे. खरं तर कपूर कुटुंबात जन्मलेल्या प्रत्येक मुला-मुलीला अभिनयाचं बाळकडू मिळत असतं. पण तरी देखील रणबीर कपूर अभिनय शिकायला अमेरिकेत गेला होता. त्यानं अमेरिकेत अभिनयाचं शिक्षण घेतलं. अभिनयाचं शिक्षण घेतल्यानंतरच त्यानं सावरिया सिनेमातून बॉलिवूडमध्ये एन्ट्री केली.पण त्याचा पहिलाच सिनेमा सावरिया बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला होता. पण यानंतर त्यानं अनेक हिट सिनेमे दिले. रॉकस्टार सिनेमातून तो अभिनेता म्हणून समोर आला. तर दोन वर्षांपूर्वी आलेला त्याचा ॲनिमल हा सिनेमाही प्रचंड गाजला.बॉलिवूडचा नवीन फळीतील सगळ्यात मोठा स्टार म्हणून रणबीरकडे पाहिलं जातं. अभिनय, लुक या सगळ्याच बाबतीत तो वरचढ आहे. त्याच्या अभिनयाचं



श्रेय तो अभिनय शिकलेल्या न्यूयॉर्क इथल्या संस्थेला देतो.२००७ मध्ये रणबीरनं सिनेइंडस्ट्रीत पाऊल ठेवलं होतं.

त्यानंतर राजनीति, ए दिल है मुश्किल, रॉकस्टार, ये जवानी है दीवानी, ब्रह्मास्त्र: पार्ट वन, तू झूठी मैं मक्कार आणि ॲनिमल सारखे सिनेमे त्याने दिले. त्याच्या ॲनिमल सिनेमानं तब्बल ९२० कोटींची कमाई केली होती.रणबीरच्या संपत्तीबद्दल बोलायचं झालं तर इतक्या वर्षांच्या करिअरमध्ये रणबीरनं कोट्यवधींची संपत्ती जमवली आहे. काही रिपोर्ट्सनुसार त्याचं नेटवर्थ हे ३४५ कोटींचं आहे. पण संपत्तीच्या बाबतीत रणबीर त्याच्या बायकोच्या मागेच असल्याचं दिसतंय कारण आलिया भट्टचं नेटवर्थ हे ५५० कोटी असल्याचं म्हटलं जातंय.

## बदलापूर स्थानकात अपघातजन्य स्थिती, एल्फिस्टन सारखी घटना

### राजू पाटील यांचा रेल्वे प्रशासनाला खडा सवाल...

**डोंबिवली :** मनसे नेते राजू पाटील यांनी बदलापूर स्टेशनवरील व्हिडिओ एक्स हँडलवर पोस्ट केला आहे, यात बदलापूरमधील नागरिक आणि प्रवासी चेंगराचेंगरीत चालताना दिसत आहे. त्यामुळे परळ एल्फिन्स्टन पुलाच्या चेंगराचेंगरिचा विषय पुन्हा एकदा पुढे आला आहे, त्यामुळे रेल्वे प्रशासन इथे लक्ष देणार का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. २ दिवसापूर्वीचा आहे, परंतु आताही परिस्थिती अशीच आहे. तुम्ही कसली वाट पाहताय? मुंबई उपनगरची मुख्य वाहिनी म्हणून रेल्वेकडे पाहिले जाते. या रेल्वे प्रशासनाचे थोडे जरी नियोजन चुकले तर काय परिस्थिती ओढवू शकते, त्याचं विदारक दृष्य परळ एल्फिन्स्टन पुलाच्या चेंगराचेंगरीत संपूर्ण मुंबईने पाहिलं आहेसध्या बदलापूर होम प्लॅटफॉर्मवर सुद्धा अशीच अपघातजन्य परिस्थिती रोज पहायला मिळत आहे. प्रवाशांचा विचार न करता रेल्वे प्लॅटफॉर्म्सवर केले जाणारे बदल



प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत आहेत. अचानक लावलेले फेन्सिंग आणि प्लॅटफॉर्म उभारणीच्या कामात चुकलेले नियोजन धोक्याची घंटा ठरत आहेत. तरीही रेल्वे प्रशासन याकडे दुर्लक्ष का करतंय? तुम्ही कसली वाट पाहताय? पुन्हा परळ-एल्फिस्टन सारख्या एखाद्या घटनेनेच प्रशासनाला जाग येणार का ??

मनसे नेते राजू पाटील नेहमीच आपल्या आक्रमक शैलीत काही स्थानिक प्रश्नांना वाचा फोडत असतात. अनेकदा त्यांनी या स्थानिक प्रश्नांवरुन सरकारला घेरले आहे. आता त्यांनी बदलापूर स्थानकातील हा गर्दीचा विषय नमूद करत सरकारला आणि रेल्वे प्रशासनाला एल्फिस्टन पूल घटनेची आठवण करुन दिली आहे. याकडे सरकारचे तसेच रेल्वे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

# वेव्हज परिषद-२०२५ निमित्त जय महाराष्ट्र कार्यक्रमात सचिव डॉ. अन्बळगन पी. यांची मुलाखत

जनसंचलन/बुलढाणा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित जय महाराष्ट्र कार्यक्रमात ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिटफ्व्हेज-२०२५ परिषदेनिमित्त उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन पी. यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे. जय महाराष्ट्रफ्कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार दि. २९ एप्रिल २०२५ रोजी दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर रात्री ८.०० वा. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर खाली दिलेल्या लिंकवरून ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदक सुषमा जाधव यांनी ही मुलाखत घेतली आहे.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून ङ्कऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट म्हणजेच वेव्हज-२०२५फचे आयोजन करण्यात आले आहे. ही परिषद १ ते ४ मे २०२५ या कालावधीत जिओ कन्व्हेशन सेंटर, बीकेसी, मुंबई येथे होणार आहे. जगभरातील विविध देशांमधील मनोरंजन आणि निर्मितीशी संबंधित क्षेत्रातील मान्यवर यानिमित्ताने एकत्र येणार आहेत. या परिषदेच्या माध्यमातून भारताच्या सर्जनशील शक्तीला, क्रिएटीव्ह इकॉनॉमीला चालना मिळणार आहे. यानिमित्त होणारे नियोजित कार्यक्रम आणि तयारीबाबत उद्योग विभागाचे सचिव डॉ. अन्बळगन पी. यांनी जय महाराष्ट्र कार्यक्रमात माहिती दिली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन साजरा

जनसंचलन/बुलडाणा

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची दि.२८ एप्रिल रोजी दशकपूर्ती झाल्यानिमित्त सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात सेवा हक्क दिन साजरा करण्यात आला. नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त विविध सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा पारदर्शक, गतिमान व विहीत कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम दि. २८ एप्रिल २०१५ पासून अंमलात आला. या अधिनियमाची दशकपूर्ती झाल्यानिमित्त हा दिवस जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सेवा हक्क दिनाच्या अनुषंगाने सेवा कटिबद्धतेची शपथ घेतली. या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी सदाशीव शेलार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, उपजिल्हाधिकारी अजिंक्य गोडगे, उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड, तहसिलदार वृषाली केसकर आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अक्षयतृतीयेला बालविवाह रोखण्यासाठी उपाययोजना लागू...

## बालविवाह केल्यास शिक्षा आणि दंडाची तरतूद



जनसंचलन/बुलढाणा

अक्षय तृतीयाच्या दिवशी बाल विवाह होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी अक्षयतृतीयाच्या दिवशी जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यासाठी बालविकास प्रकल्प अधिकारी, ग्राम पंचायत अधिकारी, पोलीसपाटील, अंगणवाडी सेवीका यांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ लागू असून याचे नियम महाराष्ट्र बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २०२२ देखील लागू आहेत. या अधिनियमानुसार बालविवाह आयोजित करणे अजामीनपात्र गुन्हा आहे. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २००६ नुसार बालविकास प्रकल्प अधिकारी यांना शहरी, तर ग्रामीण भागासाठी ग्राम पंचायत अधिकारी यांना बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित केले आहे. तसेच ग्रामीण भागाकरीता अंगणवाडी सेविका, तसेच शहरी भागाकरिता पर्यवेक्षिकांना सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. अक्षयतृतीया या दिवशी जिल्ह्यात बालविवाह होऊ शकतात. यास प्रतिबंधक म्हणून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. पुरुषाने बालवधूशी विवाह केल्यास सदर पुरुषाला दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. तसेच जाणीवपूर्वक बालविवाह ठरविणाऱ्यास, सोहळा पार पाडणाऱ्यास किंवा प्रोत्साहन देणाऱ्यास दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद आणि एक लाख रुपयांपर्यंतचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. बालविवाह झाल्यास, संबंधित वर-वधूंचे आई-वडिल किंवा पालक व अन्य नातेवाईक, मित्र परिवार, मंदिरातील विश्वस्त, फोटोग्राफर, प्रिंटिंग प्रेस, वाजंत्री, सभागृह व्यवस्थापक, कॅटरिंग अशा सर्वांनी बालविवाह घडविण्यास प्रत्यक्ष मदत केली किंवा तो रोखण्यासाठी प्रयत्न केले नाहीत, जे अशा विवाहात सामील झाले होते, अशा सर्वांना दोन वर्षापर्यंत सक्त मजुरीची कैद व एक लाख रुपयांपर्यंतचा दंड होऊ शकतो. सोबत ग्रामसेवकांनी जन्म दाखल्याची खोटी नोंद केल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येणार आहे. दि. ३० एप्रिल २०२५ रोजीच्या अक्षयतृतीयेला संभावित बालविवाहाच्या घटना रोखण्यासाठी सर्व यंत्रणांनी बालविवाह प्रतिबंधात्मक अधिनियमातील तरतुदीनुसार बालविवाह रोखण्याबाबत जनजागृती करण्यात आली आहे. तसेच बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ ची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. बालविवाह बाबत काही माहिती असल्यास टोल फ्रीकमांक १०९८ वर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे.

# औषध जनजागृती कार्यशाळा संपन्न

जनसंचलन/बुलढाणा

अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत नुकतेच केमिस्ट भवन, चिखली येथे औषध जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी औषधे व सौंदर्य प्रसाधन कायदा १९४५, औषधे व आक्षेपार्ह कायदा, मेडीकल डिवायसेस कायदा २०१७, नार्कोटेक व सायस्कोट्रीपीक सबस्टेशन कायदा, औषधे व चमत्कारीक उपचार, आक्षेपार्ह जाहिराती कायदा १९५४ अशा विविध विषयावर सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन करण्यात आले. सहायक आयुक्त(औषधे) गजानन प्र. घिरके मार्गदर्शन करताना म्हणाले, एमटीपी किट, सिलडेनफिल बटन कॅप, अल्पोझोनॉल, नायट्रोझेपान, इत्यादी महत्वाची औषधे विना बिल खरेदी करु नये. तसेच आरएमपी() डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय औषधी देऊ नये. डॉक्टराच्या चिठ्ठीशिवाय औषधे विक्री करणाऱ्या पेढीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगीतले. शिबिरामध्ये स्त्री भृणहत्या रोखणे, जास्त प्रमाणात अलोपॅथीक औषधांचे सेवन करणे, एफडीए सॉप्टवेअरचा अभ्यास करुन अप्रमाणीत औषधे विक्री करु नये, अशा विविध विषयावर चर्चा करण्यात आले. कार्यशाळेसाठी चिखली तालुक्यातील केमिस्ट अँन्ड ड्रगिस्ट, या परिसरातील फार्मासिस्ट यांचा समावेश होता. मार्च महिन्यामध्ये देऊळगांव राजा, सिंदखेडराजा, दुसरबीड व डोणगांव या गावात सुध्दा केमिस्ट संघटनेची औषध जनजागर कार्यशाळा घेण्यात आले.



# मुंबईत वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिटचे भव्य आयोजन

## पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्घाटनासाठी उपस्थित राहणार - उद्योग मंत्री उदय सामंत



**जनसंचलन/बुलढाणा**

मुंबई बीकेसी येथील जियो वर्ल्ड सेंटर येथे १ मे पासून ४ मे २०२५ पर्यंत ड्ववर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिटच्या भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमाचे १ मे रोजी उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज बीकेसी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाकडे असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे. पंतप्रधान मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या सोबत परराष्ट्र मंत्री एस.जयशंकर, केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचाही सहभाग राहणार आहे. उद्योग मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले की, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर आहे. विशेषतः हिंदी चित्रपटसृष्टीचे माहेरघर हे मुंबईला म्हटले जाते. भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांनी याच महाराष्ट्रामध्ये मराठी चित्रपट सुरू केले. त्यामुळे मनोरंजनाच्या क्षेत्रात मुंबई ही देशात अग्रगण्य शहर आहे. त्याचबरोबर, गेल्या तीन वर्षात महाराष्ट्रात परकीय गुंतवणूक ही एक नंबरला आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रात देखील महाराष्ट्र आणि मुंबई एक नंबरला राहिलेले आहे. पर्यटनाच्या दृष्टीने देखील महाराष्ट्र या देशाच्या पातळीवर अन्य देशांशी स्पर्धा करतो आहे. म्हणून पर्यटनाची सगळी स्थळे जागतिक पातळीवर जावी, हा देखील या वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेन्मेंट समिटच्या उद्देश आहे. तसेच महाराष्ट्राची संस्कृती, महाराष्ट्राची सांस्कृतिक संस्कृती, औद्योगिक संस्कृती, पर्यटन संस्कृती आणि ज्या काही महाराष्ट्राच्या परंपरा आहेत, त्या जागतिक पातळीवर जाव्यात, यासाठी मुंबई शहराची निवड केंद्र शासनाने केलेली असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले उद्योग मंत्री श्री. सामंत यांनी सांगितले की, या कार्यक्रमात ३३ देशांतील मंत्री व मंत्रिस्तरीय अधिकारी, तसेच १२० आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बॉलिवूड, टॉलीवूड, मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक दिग्गज कलाकार व निर्मातेही कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले . या चार दिवसीय सोहळ्यात भारत पॅव्हेलियन, महाराष्ट्र पॅव्हेलियन, तेलंगणा पॅव्हेलियन तसेच अन्य संस्थांचेही पॅव्हेलियन उभारण्यात येणार आहेत. त्यांचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी करणार आहेत. विविध क्षेत्रांतील परिसंवाद, राउंड टेबल कॉन्फरन्स, आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असेल. विशेषतः तिसऱ्या दिवशी म्हणजे ३ मे रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर ए. आर. रहमान यांच्या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, औद्योगिक व पर्यटन क्षेत्राला जागतिक स्तरावर नेण्याची संधी आहे. या भव्य आयोजनासाठी राज्य शासनाला सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे, असे आवाहनही उदय सामंत यांनी केले.

# जिल्ह्यात पाकिस्तानी नागरिकांचा शोधासाठी पोलिसांची मोहीम

**जनसंचलन/बुलडाणा**

पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारताने पाकिस्तान विरोधात लागू केलेल्या निर्बंधांच्या अनुषंगाने देशभरात प्रदीर्घ कालावधीच्या व्हिसावर आलेल्या पाकिस्तानी नागरिकांचा शोध सुरू आहे. बुलढाणा जिल्ह्यातही या संदर्भात पोलिस प्रशासनाने तपासमोहीम राबवली. मात्र, जिल्ह्यात एकही पाकिस्तानी नागरिक कामानिमित्त आलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. २५ एप्रिल रोजी जिल्हा पोलिस प्रशासनाने या विषयाच्या अनुषंगाने विशेष मोहीम राबवली. दिवसभर सुरू असलेल्या या तपास मोहिमेत जिल्ह्यात एकही पाकिस्तानी नागरिक नसल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, याच संदर्भात जानेवारी महिन्यात जळगाव जामोद येथे एका लग्नसमारंभासाठी एक पाकिस्तानी जोडपे आले होते, मात्र समारंभानंतर ते परत गेले असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील काही भागांमध्ये असलेल्या सिंधी कॉलनीमध्ये सिंधी समाजातील नातेवाईक भेटीसाठी येत असतात, मात्र अलीकडील काळात अशा स्वरूपाचे कोणतेही आगमन झाले नसल्याचेही पोलिस तपासातून स्पष्ट झाले आहे, असे सूत्रांनी सांगितले.





आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा
बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८